**ठळक बातम्या**

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन येत्या बुधवारी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार

- बिहार विधानसभा निवडणुकीचं वेळापत्रक आज जाहीर होणार

- राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कारांचं राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण

- गाझामधे इस्रायलच्या हल्ल्यात गेल्या चोवीस तासात ६५ पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू

**आणि**

- जयपूरच्या सवाई मानसिंग रुग्णालयातल्या आगीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी ६ सदस्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन

**<><><><><>**

नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन येत्या बुधवारी आठ ऑक्टोबरला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे . येत्या डिसेंबर पासून या विमानतळावरुन उड्डाणांना सुरुवात होईल. महाराष्ट्र नगरविकास आणि औद्योगिक विकास महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी ही माहिती दिली. विमानतळाला ३० सप्टेंबर रोजी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून परवाना मिळाला आहे.

**<><><><><>**

निवडणूक आयोग आज दुपारी चार वाजता नवी दिल्लीत बिहार विधानसभा निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर करणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांच्यासह वार्ताहर परिषद घेणार आहेत. निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या कि आदर्श

आचारसंहिता लागू होईल. २४३ सदस्यांचा समावेश असलेल्या बिहार विधानसभेचा कार्यकाळ येत्या २२ नोव्हेंबरला समाप्त होत आहे. बिहार विधानसभेच्या निवडणुकीच्या तारखा जाहीर करताना सर्वंकष विचार केला जाईल मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काल वार्ताहर परिषदेत स्पष्ट केलं होतं.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आज सकाळी मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेअंतर्गत २१ लाख महिलांच्या बँक खात्यात प्रत्येकी दहा हजार रुपयांचा निधी हस्तांतरित केला. एकवीसशे कोटी रुपयांचं हे हस्तांतरण म्हणजे या योजनेचा तिसरा टप्पा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या २६ सप्टेंबरला या योजनेचं उद्घाटन केलं होतं. महिलावर्गात उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या या योजनेमधे बिहारमधल्या १ कोटी १० लाख महिलांची निवड झाली आहे. नितीश कुमार यांनी आज पाटणा मेट्रो रेल्वे सेवेचं उद्घाटन केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या प्रकल्पाची पायाभरणी फेब्रुवारी २०१९ मध्ये केली होती. पहिल्या टप्प्यातल्या या मेट्रो मार्गावर उद्यापासून प्रवासी सेवा सुरु होईल. प्रत्येक गाडीला तीन डबे असून ती एका फेरीत ९०० प्रवासी वाहून नेईल.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा परिषदेनं जीएसटी कररचनेत केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. नव्या कररचनेमुळे अनेक वस्तू, पदार्थ स्वस्त झाल्याने ग्राहकांना याचा फायदा होणार आहेच, शिवाय राज्यांच्या अर्थव्यवस्थेलाही मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. आज आपण जाणून घेणार आहोत जीएसटी सुधारणेमुळे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या सकारात्मक परिणामाबद्दल....

**-----व्हीसी-----(१.१० सेकंद)**

*(नव्या कररचनेमुळे महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांना मोठा फायदा होणार आहे. राज्यात साखर कारखाने, फळ-भाज्या प्रक्रिया उद्योग, मत्स्यव्यवसाय, हातमाग उद्योग यासह अनेक लघु आणि मध्यम उद्योग आहेत. जीएसटी सुधारणेमुळे या सर्व क्षेत्रातील वस्तूंचा उत्पादन खर्च कमी होणार आहे, त्यामुळे वस्तूंच्या किमतीही कमी होतील आणि ग्राहकांना दिलासा मिळेल. तसंच शेतकरी, कारागीर, कामगार आणि व्यावसायिकांना याचा थेट लाभ मिळणार आहे. परिणामी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था बळकट होण्यास यामुळे मदत मिळणार*

*आहे. प्रक्रिया केलेल्या साखर आणि अन्नपदार्थावरील जीएसटी कमी झाल्यामुळे त्यांचे  दर ६ ते ७ टक्क्यानी कमी झाले आहेत. जवळपास ५० लाख शेतकरी आणि २ लाख कामगारांना याचा फायदा मिळणार आहे. प्रक्रिया केलेल्या आणि परीरक्षण केलेल्या माशांवरचा जीएसटी ५ टक्के झाला आहे, याचा लाभ दोन लाख मच्छिमारांना होणार आहे. कापड, चामडे, पैठणी आणि वारली कलाकृतीवरच्या जीएसटी सवलतीमुळे एक लाखापेक्षा जास्त कामगार आणि कारागिरांच्या आयुष्यात सकारात्मक बदल होणार आहेत. वाहन उद्योग, संरक्षण, माहिती तंत्रज्ञान, औषध निर्माण, विमा या सर्व क्षेत्रांमधे जीएसटी सुधारणा झाल्यामुळे लाखो लोकांना लाभ होणार असून त्यांचं जीवनमान उंचावण्यास हातभार लागणार आहे. त्यामुळे जीएसटी सुधारणांमुळे  महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीला वेग मिळेल यात शंका नाही.)*

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात झालेल्या सोहळ्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे २०२२-२३ सालासाठीचे माय भारत पुरस्कार वितरित केले. सेवा योजनेचे कार्यकर्ते विद्यार्थी , कार्यक्रम अधिकारी तसंच एनएसएस युनिट्सना उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल हे पुरस्कार दरवर्षी दिले जातात. केंद्रीय युवा व्यवहार मंत्री मनसुख मांडवीय हेही यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

इस्रायलने गाझावर केलेल्या हल्ल्यात गेल्या चोवीस तासात ६५ पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला आहे. तर १५३ जण जखमी झाले आहेत. इस्रायली हल्ल्यात आतापर्यंत  ६७ हजार १३९ जणांचा मृत्यू झाला असून १ लाख ७० हजार जण जखमी झाल्याचं गाझाच्या आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. संघर्ष सुरू झाल्यापासून उपासमारीने ४६० जणांनी प्राण गमावल्याचंही त्यांनी सांगितलं आहे. गाझापट्टीतील संघर्ष थांबवण्याबाबत चर्चा सुरू असतानाही गेल्या ४८ तासात इस्रायलने १३० हून अधिक  हवाई हल्ले केल्याचं वृत्त आहे.

**<><><><><>**

राजस्थानातल्या जयपूरमधल्या एस एम एस रुग्णालयाला लागलेल्या आगीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी ६ सदस्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. जयपूर इथल्या सवाई मानसिंग रुग्णालयाच्या ट्रॉमा सेंटरच्या आयसीयूमध्ये काल रात्री उशिरा लागलेल्या आगीत सात रुग्णांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे. राष्ट्रपती द्रौपद्री मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आजपासून दोन दिवसांच्या कतार दौऱ्यावर रवाना होत आहेत. कतारची राजधानी दोहा इथं गोयल कतारच्या वाणिज्य मंत्र्यांसह कतार भारत संयुक्त आयोग बैठक आयोगाचे अध्यक्षस्थान भूषवणार असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे. या भेटीतून भारत - कतार यांच्या दरम्यानच्या व्यापार आणि गुंतवणूक संबंधांचे महत्त्व अधोरेखित होणार असल्याचंही मंत्रालयानं नमूद केलं आहे. कतारमध्ये व्यावसायिक, सनदी लेखापाल संघटना,उद्योग परिषद, उद्योग सदस्य आणि भारतीय समुदायाशी गोयल संवाद साधतील.

**<><><><><>**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह येत्या ९ ऑक्टोबरपासून दोन दिवसांच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर रवाना होणार आहेत. ऑस्ट्रेलियाचे उपप्रधानमंत्री आणि संरक्षण मंत्री रिचर्ड मार्लस यांच्या निमंत्रणावरून हा दौरा होणार आहे. यावेळी संरक्षण मंत्री दोन्ही देशांतील आघाडीच्या उद्योजकांच्या परिषदेचं अध्यक्षपद भूषवणार आहेत. या भेटीमध्ये तीन करार होण्याची अपेक्षा असून, ज्यामुळे माहितीची देवाणघेवाण, सागरी क्षेत्र आणि संयुक्त उपक्रमाच्या क्षेत्रात सहकार्य वृद्धींगत होण्याची अपेक्षा असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

संरक्षण उत्पादन क्षेत्रातील नव्या संधी या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उद्या नवी दिल्ली इथं करणार आहेत. संरक्षण उत्पादनात स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने संरक्षण मंत्रालय आणि राज्यं तसंच केंद्रशासीत प्रदेश यांच्यात समन्वय साधणं हे या परिषदेचं उद्दिष्ट आहे. याप्रसंगी संरक्षण मंत्री एक्जिम पोर्टलचं उद्घाटन करतील.

**<><><><><>**

लडाखमधले वैज्ञानिक आणि पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या अटकेबद्दल सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि लडाख प्रशासनाकडून एका आठवड्यात जबाब मागितला आहे. लडाखमधे हिंसक आंदोलनं झाल्यानंतर सोनम वांगचुक यांना १४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटक झाली आहे. पुढची सुनावणी येत्या १४ ऑक्टोबरला होईल.

**<><><><><>**

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल भारताने पाकिस्तानचा ८८ धावांनी पराभव केला. भारतानं दिलेल्या २४७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ १५९ धावांवर बाद झाला. क्रांती गौड आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. क्रांती गौड सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली. स्पर्धेत भारताचा हा दुसरा विजय असून भारतीय संघ गुणतालिकेत अव्वलस्थानी आहे. भारताचा सामना आता दक्षिण आफ्रिकेविरुद्ध येत्या ९ तारखेला विशाखापट्टणम इथं होणार आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल राज्यात दार्जिलिंगमध्ये मुसळधार पावसामुळे झालेल्या भूस्खलनाच्या घटनांमध्ये आतापर्यंत २३ जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

भारतीय हवामानशास्त्र विभागानं दिल्ली, हरियाणा, पंजाब, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, उत्तराखंड आणि राजस्थानला आज मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. आज बिहार, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेशचा किनारी भाग, झारखंड, ओडिशा, तेलंगणा, केरळ, कर्नाटक इथे जोरदार वाऱ्यांसह वीज चमकण्याची आणि ढग गडगडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसंच

येत्या दोन- तीन दिवसांत ईशान्येकडची राज्यं, पश्चिम बंगाल, तामिळनाडू , पुदुचेरी आणि उत्तर प्रदेशच्या पश्चिम भागात मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

//<><><><><>//